# - प्रेस नोट -

दि. १८/०९/२०२६

## शिवाजी नगर पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न

दि.१५/०९/२०२६ रोजी २३.४५ वा.च्या सुमारास फिर्यादी अबरार मुक्तार अहमद वय-२८ वर्षे, धंदा-नोकरी, रा.ठी. बैगनवाडी संजयनगर, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई हे रस्त्याने जात असताना नागोरी हॉटेल समोर, रोड क्र.०८, शिवाजीनगर, मुंबई येथे रोड शेजारी बसलेला अटक आरोपी पुरुष वय-२५ वर्षे याने अचानक फिर्यादी यांच्या समोर येऊन त्यांना चाकु दाखवुन पैसे मागितले असता फिर्यादी यांनी पैसे देण्यास नकार दिल्याने अटक आरोपी याने फिर्यादी यांच्या गळयावर चाकु लावुन शिवीगाळ करून पैसेची मागणी करत फिर्यादी यांच्या शर्टचे खिसे तपासत असताना फिर्यादी यांनी त्यास प्रतिकार केला असता अटक आरोपीने फिर्यादी यांस जीवे ठार मारण्याची धमकी देऊन फिर्यादींच्या डाव्या छातीवर चाकु घुसवला. फिर्यादी जखमी झाल्याने खाली पडल्यावर अटक आरोपीने फिर्यादी यांच्या खिशातील ५०० रूपये काढुन निघुन गेला त्यानंतर फिर्यादी यांचे मित्र मिराज शेख, अयुब व अस्लम यांनी फिर्यादीस उपचाराकामी राजावाडी हॉस्पीटल येथे घेऊन गेले. म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १७/०९/२०२६ रोजी गु.र.क्र .७८७/२६, कलम १०९(१), ३११, ३५२, ३५१(३) बीएनएस २०२३ सह कलम ३७(१)(अ),१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------